दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ६५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२९ मे २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## दि.बा.पाटलांचे नाव दिल्याशिवाय भरावाचा एकही दगड टाकू देणार नाही : लोकनेते रामशेठ ठाकूर

**दै.रायगड नगरी । उरण**

**नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा. पाटलांचे नाव द्यावे या मागणीसाठी उरण तालुक्यातील टाऊनशिप येथील भागूबाई चांगा ठाकूर इंग्रजी माध्यम स्कूल येथील सभागृहात घेण्यात आलेल्या सर्वपक्षीय आढावा बैठकित लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते. यावेळी विमानतळाला दि.बा.पाटील यांचे नाव दिल्याशिवाय विमानतळाच्या जागेवर पुढील कामाचा एकही दगड टाकू देणार नसल्याचा निर्धार रामशेठ ठाकूर यांनी केला आहे.**



या आंदोलनाच्या तयारीसाठी उरण तालुक्यातील गावोगावी व पंचायत समिती गण निहाय बैठकांचे आयोजन करा तेथे आम्ही सर्व नागरिकांना मार्गदर्शनासाठी उपस्थित राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तर आगरी, कोळी, कराडी, एस सी, एन टी समाजासह उरणच्या आमदारांच्या अनुषंगाने शहरातील मारवाडी समाजाचाही मोठा पाठींबा मिळाला आहे.

त्यामुळे सर्वांनी राजकीय चपला बाजूला ठेऊन एकजुटीने प्रकल्पग्रतांच्या न्याय हक्कांसाठी लढणारे दिंवगत नेते दि.बा.पाटील यांचे नाव नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे या मागणीसाठी लढा देऊ या असे सांगून आपला आवाज मुंबई, महाराष्ट्रासह दिल्ली पर्यंत पोहोचवून दि.बा.पाटलांच्या नावाला मान्यता मिळविण्यासाठी साऱ्यांनी एकसंघ होऊ या असेही ठाकूर यांनी शेवटी नमूद केले.

या आढावा बैठकीसाठी प्रकल्प संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, काँग्रेस नेते संतोष केणी, जेएनपीटी कामगार विश्वस्त भूषण पाटील, मनसेचे अतुल भगत, जे.डी.तांडेल, माजी सभापती नरेश घरत, भाजपा तालुका अध्यक्ष रवि भोईर, उरण शहर काँग्रेसचे अध्यक्ष किरीट पाटील, वैजनाथ ठाकूर, उरणच्या नगराध्यक्षा सायली म्हात्रे, रेखा घरत, सिमा घरत, राणी म्हात्रे,कामगार नेते सुरेश पाटील, माजी सरपंच महेश कडू, प्रेमनाथ ठाकूर, उरण शहरातील नगरसेवकांसह तालुक्यातील नागरिक व महिला उपस्थित होत्या.

## आनंदवार्ता ! राज्यात कोरोना रुग्णसंख्येचा रिकव्हरी रेट ९३.२४ टक्क्यांवर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात नवीन कोरोना रुग्णसंख्येचा आलेख आज आणखी खाली आला आहे. रिकव्हरी रेट वाढल्याने समाधान व्यक्त केलं जातंय. राज्यात आज २०,७४० नव्या कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. तर आज ३१ हजार ६७१ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आल्याने रिकव्हरी रेट ९३.२४ टक्क्यांवर पोहचला आहे. दरम्यान आज ४२४ कोरोना बाधित रुग्णांचा मृत्यू झालाय.

आजपर्यंत एकूण ५३,०७,८७४ कोरोना बाधित रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९३.२४ टक्के एवढे झाले आहे. सध्या राज्यातील मृत्यूदर १.६४ टक्के एवढा आहे. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या ३,४३,५०,१८६ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ५६,९२,९२० (१६.५७ टक्के) नमुने पॉझिटिव्ह आले आहेत. सध्या राज्यात २१,५४,९७६ व्यक्ती होम क्वारंटाईनमध्ये आहेत तर १६,०७८ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत. राज्यातील ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या २ लाख ८९ हजार ०८८ इतकी झाली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमधील सक्रिय रुग्णांच्या संख्येतही घट होताना दिसत आहे. राज्यातील सक्रिय रुग्णांचा जिल्हानिहाय विचार करता पुणे जिल्ह्यात सक्रिय रुग्णांची संख्या सर्वाधिक आहे. पुण्यात एकूण ४२ हजार ५५० इतके रुग्ण आहेत. मुंबई पालिका हद्दीत हा आकडा २८ हजार ७९३ इतका आहे. ठाणे जिल्ह्यात सध्या २० हजार ००८ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. तर नागपूर जिल्ह्यात ही संख्या १४ हजार ५९३ इतकी झाली आहे. नाशिकमध्ये सक्रिय रुग्णांची संख्या १० हजार ७६७ इतकी आहे.

## १० वी च्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हे प्रत्येक विषयानुसार होणार : ना.वर्षा गायकवाड

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील इयत्ता १० वीच्या परीक्षांबाबत शालेय शिक्षण विभागानं मोठा निर्णय घेतला आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देत इयत्ता १० वीच्या परीक्षा रद्द करत असल्याचा निर्णय याआधीच शिक्षण विभागानं जाहीर केला होता. पण विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करताना त्यांचं मूल्यमापन नेमकं कशापद्धतीनं केलं जाणार? असा सवाल उपस्थित केला जात होता. यासंदर्भात आज शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी सविस्तर माहिती दिली आहे.



राज्यातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचं आरोग्य हेच सरकारचं प्राधान्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर बोलवणं योग्य होणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करण्याचा निर्णय सरकारनं याआधीच घेतला आहे. पण विद्यार्थ्यांचं मूल्यमापन हे प्रत्येक विषयानुसार होणार असून त्यासाठी प्रत्येक विषयाला १०० गुणांच्या आधारावर मूल्यमापन केलं जाणार आहे, असं वर्षा गायकवाड यांनी सांगितलं.

राज्यातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा केंद्रांवर परीक्षा होणार नसली तरी त्यांच्या आजवरच्या शालेय कामगिरीच्या आधारावर १०० गुणांची विविध भागांत विभागणी करण्यात आली आहे. यात दहावीच्या अभ्यासक्रमावर लेखी परीक्षेसाठी ३० गुण, इयत्ता १० वीचे विद्यार्थ्यानं आजवर केलेले गृहपाठ आणि तोंडी परीक्षेसाठी २० गुण आणि इयत्ता नववीच्या निकालाला ५० गुण ..../२

## संक्षिप्त...

### गुरुवारपर्यंत मुख्यमंत्री निर्णय घेणार : अजित पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आषाढी वारी सोहळ्याबाबत आज उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्यासोबत वारकऱ्यांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. या बैठकीत वारकऱ्यांनी जास्तीत जास्त पाचशे आणि कमीतकमी शंभर व्यक्तींच्या उपस्थितीत पायी वारी सोहळा करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे. वारीमध्ये अनेक घटक सहभागी होत असतात. त्यामुळे वारीबद्दल आज निर्णय झा–लेला नाही. कॅबिनेटमधे यावर चर्चा होईल आणि मुख्यमंत्री याबाबतचा अंतिम निर्णय घेतील, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलीय. आषाढी वारी संदर्भात राज्य सरकारने ९ जूनपर्यंत याबाबतचा निर्णय जाहीर करावा. वारीच्या मार्गात येणाऱ्या गावकऱ्यांशी देखील संपर्क करण्यात आला आहे. मात्र, सरकारचा निर्णय आम्हाला मान्य असेल, अशी प्रतिक्रिया वारकऱ्यांचे प्रतिनिधी भाऊसाहेब गंभीरे आणि अशोक सावंत यांनी दिला आहे.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

संपर्क : ९८२०३५५३४६

## म्हसळा शहरात अल्पवयीन मुलीवर बलात्कार : आरोपी अटकेत

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा शहरात दिघी नाक्यावर रात्री ९वा. अल्पवयीन मुलीवर बलात्काराची घटना घडल्याची नोंद म्हसळा पोलीसानी केली आहे. अल्पवयीन मुलगी चायनीज घेऊन घनसार कॉम्लेक्स मधील आपल्या घरी जात असताना घटना घडल्याचे पोलीस सूत्रानी सांगितले.

म्हसळा पोलीसानी गु.र.नं.४१/२०२१ भा.द.वि.कलम ३७६ (२),(आय )(जे) सह बाल लैंगिक अपराधा पासून सरक्षण अधिनीयम कायदा (पोस्को) २०१२, कलम ४,८,१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अल्पवयीन मुलगी दिघी नाक्यावरील रिक्षा स्टँडजवळील चायनीज सेंटर मधून चायनीज घेऊन घनसार कॉम्लेक्स मधील आपल्या घरी जात असताना जिन्या जवळच दबा धरून बसलेल्या सुमारे २४ वर्षीय अविवाहीत युवकाने मुलीचा हात धरून तीच्या खोलीत नेऊन बलात्कार केल्याचे पोलीस सूत्रानी सांगितले. आरोपी पोलीसांच्या ताब्यात असून पुढील तपास स.पो.नी.उद्धव सुर्वे उप–विभागीय पोलीस अधिकारी, श्रीवर्धन बापूसाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

## बेकायदेशीर बांधण्यात आलेल्या गाळ्यांवर उरण तहसिलची कारवाई

### नैसर्गिक नाल्याचे पाणी निचरा होण्यासाठी बांधकाम जमीनदोस्त

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरालगत प्रवेशद्वारासमोर असलेल्या चाणजे ग्रामपंचायतीचे हद्दीतील कोटनाका काळाधोंडा येथील उरण – बोकडविरा रोडवरील राघोबा मंदिर ते रेल्वे ट्रॅक या ठिकाणी येथील नागरिकांनी पाण्याचा निचरा करणाऱ्या नाल्यावर बेकायदेशीरपणे गाळे व टपऱ्यांची तथाकथित करण्यात आलेली बांधकामे उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या अधिपत्याखाली पावसाळ्यापूर्वीच जमीनदोस्त केली आहेत. त्यामुळे नैसर्गिक नाले तुंबण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे.



काल उरण तहसिलचे नायब तहसिलदार नरेश पेढवी यांनी उरणच्या पोलिस फौजफाट्यासह या नाल्यावरील ५,६ गाळे व टपऱ्यां वरील बांधकामावर कायदेशीर कारवाई करून जेसीबी यंत्राने बुलडोझर फिरवला आहे. या बांधकामामुळे उरण शहरातील व काळाधोंडा गावातील पाण्याच्या निचऱ्याची प्रश्न निर्माण झाला होता. गाळ्यांचे बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या नागरिकांना १५ दिवसांपूर्वीच सदरचे बेकायदेशीर करण्यात आले बांधकाम हटविण्याची नोटीस उरण तहसिलदारांनी बजावली होती.

मात्र १५ दिवसांचा कालावधी उलटून गेल्याने व पावसाळा जवळ आल्याने पाण्याचा निचऱ्याचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी काल या काळाधोंडा येथील बेकायदेशीर गाळ्यांवर कारवाई करून जेसीबी यंत्राने जमिनदोस्त करून नैसर्गिक नाल्याच्या पाण्याचा मार्ग मोकळा करण्यात आल्याची माहिती नायब तहसिलदार नरेश पेढवी यांनी दिली आहे.

## सिडको आपत्कालीन नियंत्रण कक्ष २४×७ तत्त्वावर राहणार कार्यरत

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाचा आपत्कालीन नियंत्रण कक्ष १ जून ते ३० सप्टेंबर २०२१ या पावसाळी कालावधीमध्ये २४ ७ तत्त्वावर कार्यरत असणार आहे. दरवर्षी पावसाळी कालावधीमध्ये सिडकोतर्फे नवी मुंबईतील सिडको अधिकार क्षेत्रातील नागरिकांकरिता आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात येतो. पावसाळ्याच्या कालावधीमध्ये उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्ती/दुर्घटना लक्षात घेता जून ते सप्टेंबर या कालावधीत सिडकोचा सुसज्ज असा आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यरत असतो.

सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन इमारतीच्या तळ मजल्यावर असलेला हा नियंत्रण कक्ष कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांसहित शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही २४ तास कार्यरत राहणार आहे. या कक्षामार्फत आपत्कालीन स्थितीत अभियांत्रिकी विभाग, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभाग, उद्यान विभाग आदी महत्त्वाच्या विभागाचे कर्मचारी २४ तास संपर्कात असतील.

सिडकोच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाद्वारे वृक्षांची पडझड/वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वृक्षांची छाटणी, रस्त्यावरील उघड्या गटारांची झाकणे पूर्ववत बसवणे, पूर/पूरसदृश परिस्थिती, रस्त्यांवरील खड्डे, रस्ते वा नाल्याजवळ साचलेला कचरा, व्यक्तींचे पाणीसाठ्याच्या ठिकाणी बुडणे, आग व आगीचे विविध प्रकार, साथीचे रोग, विषारी प्राणी चावण्यासंबंधी बाबी, इमारत कोसळणे, भूस्खलन, पाणी साचणे या आपत्तींची दखल घेण्यात येऊन त्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात येईल.

नागरिकांनी वरीलपैकी कोणतीही आपत्ती उद्भवल्यास पुढे देण्यात आलेल्या दूरध्वनी अथवा व्हॉटसप क्रमांकावर किंवा ई–मेलद्वारे सिडको आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून आपत्तीसंबंधी माहिती द्यावी किंवा त्याबाबतची तक्रार ..../२

## कोरोनापासून बालकांना सुरक्षित ठेवण्यासाठी टास्कफोर्स व विभागाने समन्वयाने काम करावे : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोनासाठी स्थापन करण्यात आलेल्या बालरोग तज्ज्ञांच्या टास्क फोर्समधील डॉक्टरांचा आणि महिला व बालविकास विभागातील अधिकाऱ्यांचा संवाद घडवून आणावा, यामध्ये बालकांना कोरोनापासून कशापद्धतीने सुरक्षित करता येईल याचे मार्गदर्शन करावे तसेच बालकांसंदर्भातील विभागाचा अनुभव आणि माहितीची देवाणघेवाण होऊन करावयाच्या उपाययोजनांचा मार्गदर्शक सुचनांमध्ये समावेश करावा, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज दिले.



मुख्यमंत्र्यांनी महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजना, निधी, कार्यपद्धती याचा सविस्तर आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस महिला व बालविकास मंत्री श्रीमती यशोमती ठाकूर, मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, महिला व बालविकास विभागाच्या सचिव आय.ए.कुंदन, आयुक्त महिला व बालविकास श्रीमती पावनित कौर, आयुक्त एकात्मिक बालविकास ..../२

## कोरोनामुळे पालक गमावलेल्या अनाथ बालकांच्या नावे ५ लाख रुपये ठेवण्याचा राज्य सरकारचा विचार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोविड काळात दोन्ही पालक गमावल्याने अनाथ झालेल्या बालकांच्या नावे ५ लाख रुपये मुदत ठेव ठेवून त्यावर येणारे व्याज त्यांना मिळणार आहे. तर एक पालक गमावलेल्या बालकांना 'बाल संगोपन' योजनेत समाविष्ट करत दरमहा २५०० रुपये मदत मिळणार आहे. मुख्यमंत्री याबाबत सकारात्मक असून लवकरच कॅबिनेट बैठकीत हा प्रस्ताव येणार आहे. महिला व बालकल्याण मंत्री यशोमती ठाकूर आणि मुख्यमंत्र्यांमध्ये आज चर्चा झाली. त्यात या विषयावर चर्चा करण्यात आली आहे. या अनाथ मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी राज्य सरकारने घ्यावी असाही प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाने दिला आहे. याआधी मध्य प्रदेश सरकारने या मुलांना अशा पद्धतीने मदत करण्याचा निर्णय घेतला होता.

कोवीड १९ आजारामुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देवून त्यांचे यथायोग्य संरक्षण, संगोपन यादृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कृती दल (टास्क फोर्स) गठित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. आता या अनाथ झालेल्या मुलांना महिन्याला पाच हजार रुपये देण्याचा राज्य सरकार विचार करत आहे. याच पार्श्वभूमीवर आज महिला आणि बालकल्याण मंत्री ..../२

## कामोठ्यात संचारबंदीदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

### कामोठे पोलीस ठाण्याच्या आवारातच पोलिसांवर दमदाटीचा प्रकार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या काळात स्वतःच्या व कुटुंबाच्या जिवाचीही पर्वा न करता पोलीस प्रशासन अह–ोरात्र आपले कर्तव्य बजावत आहे. बाहेर सर्वत्र कोरोनाचा धोका असूनही कोणतीही तमा न बाळगता नागरिकांच्या संरक्षणासाठी पोलीस प्रशासन दक्ष आहे. मात्र असे असले तरी अजूनही काही नागरिक पोलिसांनाच डोकेदुखी ठरत आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात येण्यासाठी राज्यशासनाने संचारबंदी लागू केली आहे. नागरिकांच्या हितासाठी लागू केलेल्या निर्बंधांमुळे कोरोनाचा संसर्ग कमी होण्यास मदत होत आहे, परंतु काही बेशिस्त नागरिक याकडे गांभीर्याने पाहत नाहीत. संचारबंदीचे नियम पायदळी तुडवून सुद्धा काही उर्मट नागरिक पोलिसांनाच दमदाटी करताना दिसून येत आहेत.




कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत पनवेल परिसरातील वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता प्रशासनाने कडक निर्बंध जारी केले आहेत. परंतु काही बेशिस्त नागरिक कोरोना नियमांचे उल्लंघन करून पोलिसांनाच अरेरावी करत असल्याचे दिसून येत आहे. असाच एक प्रकार गुरुवारी संध्याकाळी कामोठे पोलीस ठाणे हद्दीत घडला. संचारबंदी लागू असतानाही कामोठे पोलीस ठाण्याच्या आवारात इविनिंग वॉक करणाऱ्यांना नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कायदेशीर कारवाईकरिता पोलीस ठाण्यात आणण्यात आले. कारवाईसाठी आणलेले नागरिक पोलीस ठाण्याच्या गेटबाहेर जाऊन नये म्हणून त्याठिकाणी पोलिसांचा पहारा ठेवण्यात आला होता. त्यादरम्यान कारवाई करण्याकरिता आणलेल्या मुलींच्या आईने याचा राग मनात धरून गेटजवळ कर्तव्य निभावणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांशी वादावादी करण्याची सुरुवात केली. याचे रूपांतर शिवीगाळ आणि अंगावर धावून येण्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले. ..../२

# शेती आणि शांतता

केंद्राची ताठरता आणि आंदोलकांचा निर्धार या पेचात सापडलेल्या शेतकरी आंदोलनाला बघता बघता सहा महिने झाले. तीन कृषी कायद्यांच्या विरोधात अर्धे वर्ष रस्त्यात ठाण मांडूनही अन्नदात्याच्या समस्येवर परिणामकारक तोडगा निघू शकत नाही, हे सर्व भारतीयांचेच दुर्दैव आहे. भारतात यापूर्वीही अनेक शेतकरी आंदोलने झाली आहेत; मात्र इतका प्रदीर्घ काळ चाललेला हा पहिलाच लढा आहे. चर्चा, संवाद यांच्या औपचारिकतेपलीकडे जाऊन आस्था आणि सहृदयतेच्या माध्यमातून दोन्ही बाजू एकत्र येणार नाहीत, तोपर्यंत हा तिढा सुटणार नाही. आधीपेक्षा परिस्थिती चिघळली आहे. करोनाकाळाच्या तोंडावर कृषी कायदे बनू शकतात, तर आपत्ती सुरू असताना त्यावरील उत्तरही शोधले जावे, ही आंदोलकांची भूमिका आहे. बारा वेळा चर्चा केल्यानंतरही आंदोलक संतुष्ट नाहीत. आणखी तेवढ्याच चर्चेच्या फेऱ्या करण्यास केंद्र उत्सुक आहे, हा सरकारी अभिप्राय आहे. २०२४पर्यंत हा संघर्ष असाच कायम असेल, असा दावा 'भारतीय किसान युनियन'चे नेते राजेश टिकैत यांनी केला आहे. पोटतिडिकेने प्रश्न मांडूनही देशाच्या कृषिअर्थव्यवस्थेच्या कण्याचे दुखणे थांबलेले नाही. ही खदखद आता खोलवर झिरपली आहे. अशा अस्वस्थतेत देशातील सर्वपक्षीय नेत्यांना कृषी संस्कृतीचे पाईक म्हणवून घेण्याचा अधिकार उरला आहे काय, याचे तटस्थ आत्मपरीक्षण नागरिकांनी करायला हवे. मोदी सरकारच्या पहिल्या सत्राच्या प्रारंभातही भूमी अधिग्रहणाच्या मुद्द्यावर सरकारचा कडवा पवित्रा पुढे आला होता. अध्यादेशाच्या भरवशावर जन आंदोलनांना टक्कर देता येत नाही, याचे भान खरे तर दुसऱ्या सत्रातील घडामोडींनी यायला हवे होते. आंदोलनांकडे आत्मीय भावनेने बघण्यासाठी केंद्राला मूळ पवित्रा बदलावा लागेल. तिन्ही कृषी कायदे शेतकऱ्यांच्या फायद्याचे आहेत, याची अनुभूती मागील नऊ महिन्यांमध्ये आली नसल्याने या कायद्यांविषयीचा संभ्रम वाढतो आहे. व्यापाऱ्यांच्या हितासाठी नव्हे, तर हमी भावाच्या संरक्षणासाठी हा पुढाकार आहे, हे पटवून देण्यासाठी सरकारला जनतेच्या दारात जावे लागेल. सत्तेत आल्यानंतर केवळ समर्थकांचे नव्हे, तर विरोधकांचे समाधान होईपर्यंत प्रयत्नांचे सातत्य ठेवणे, ही केंद्राची जबाबदारी आहे. शेतकऱ्यांनीही पावसाचा तडाखा, कडाक्याची थंडी आणि उन्हाच्या तीव्र झळांचा सामना केला आहे. मधल्या काळात चर्चेच्या फेऱ्या झाल्या. सर्वोच्च न्यायालयाची समिती आली; मात्र त्यातून सामंजस्याच्या पातळीवर फार काही गवसले नाही. भावनांचा अनादर होत असल्याचा आरोप आंदोलकांकडून होत राहिला. ठरविलेल्या नियमांचे कडवे समर्थन आणि विरोधकांच्या आवाजाकडे पद्धतशीर काणाडोळा, हेच केंद्राचे धोरण असल्याचा सिंधू सीमेचा सध्याचा आवाज आहे. मध्यंतरी सरकारने दीड वर्ष कायदे स्थगित करून तोडगा शोधण्याचा प्रस्ताव ठेवला; मात्र अशा एकतर्फी निर्णयांनी तोडगा नव्हे, तिढा हाती येतो. शेवटची चर्चा होऊनही आता चार महिने होत आहेत. हमी भावाला संरक्षण देण्याचा विश्वास निर्माण करण्यासाठी, गावपातळीवर विश्वासनिर्मितीच्या योजना हव्यात. देशातील एकूण अन्नधान्य उत्पादनापैकी फक्त दहा टक्के धान्य हमीभावाने खरेदी होते, असा आरोप आहे. त्यातील सत्य कळायला हवे. या मुद्द्याचे राजकारण करू नये, अशा आशयाची वक्तव्ये दोन्ही बाजूने येत असतात. सहा महिने चाललेली चळवळ लोकलढ्याचे स्वरूप घेते; मात्र असे लढे राजकारणापासून अलिप्तही राहू शकत नाहीत. पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशाचा काही भाग हा आंदोलनाचा गाभा आहे. येत्या काही वर्षांतील पंजाबच्या निवडणूक निकालांचा अंदाज आलेला आहे. केंद्रातील सत्तेचा राजमार्ग उत्तर प्रदेशातून जातो. पश्चिम उत्तर प्रदेशात विधानसभेच्या १२१ जागा आहेत. लोकसभेच्या २० जागांचा फैसला नेमक्या या भागात होतो. दोन्ही बाजूंची माघार या वर्तमानाने अडवली आहे. संसदेचे विशेष अधिवेशन बोलावून कायदे रद्द करण्याच्या मागणीवर आंदोलक ठाम आहेत. व्यापाऱ्यांच्या नव्हे, तर शेतकऱ्यांच्या हितासाठीच कायद्यांची अंमलबजावणी केली जाईल, या सरकारी भूमिकेत बदल होण्याची शक्यता नाही. तिन्ही ऋतू झेलल्यामुळे दोन्ही बाजू टणक आहेत. 'आत्मनिर्भर भारता'ची संकल्पना आत्मनिर्भर शेतकऱ्याखेरीज शक्य नाही. केंद्रातील धोरणकर्त्यांनी हे वास्तव लक्षात घ्यावे. शेती आणि शांतता या देशाच्या उत्कर्षाच्या धमन्या आहेत. राज्यकर्त्यांनी शेतीकडे दुर्लक्ष होऊ देऊ नये. शेतकऱ्यांनीही शांततेचा मार्ग सोडू नये. राजधानीच्या रस्त्यांवरील आक्रस्ताळेपणा सामान्य नागरिकांना रुचत नाही. देशाचा श्वास म्हणविल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या मार्गातील खिळेप्रयोगही लोकांना मुळीच आवडत नाही. निर्णयाचे पाठीराखे आणि विरोधकांचे भान सुटू नये. कुठल्याही आंदोलनांचा दीर्घ काळ सरकारसाठी नव्हे, तर देशासाठीही पोषक नसतो. जगाच्या पोशिंद्याची दीर्घ नाराजी संपविण्याचा प्रामाणिक प्रयत्न व्हावा. शेतकरी आणि शांततेचा मेळ याची हमी आज देशाला हवी आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## १० वी च्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हे प्रत्येक विषयानुसार होणार : ना.वर्षा गायकवाड

अशाप्रकारे विद्यार्थ्यांचं मूल्यमापन करण्यात येणार आहे. यंदा इयत्ता १० वीच्या परीक्षेला असणाऱ्या विद्यार्थ्यांचा इयत्ता ९ वीचा निकाल लागला त्यावेळी कोरोनाचं संकट नव्हतं. त्यामुळे तो निकाल सामान्य परिस्थितीतील निकाल होता. त्याच पार्श्वभूमीवर इयत्ता ९ वीच्या निकालाला ५० गुण देण्यात आले आहेत, असं वर्षा गायकवाड यांनी सांगितलं.

इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करण्यात येणार असलं तरी शाळांद्वारे केल्या जाणाऱ्या मूल्यमापनावर विद्यार्थी नाखुश असतील तर त्यांना इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी पर्याय म्हणून सामाईक परीक्षा (सीईटी) देता येणार आहे. इयत्ता १० वीचा निकाल मूल्यमापनानं लागल्यानंतरही ११ वीच्या परीक्षेसाठी सीईटी देणाऱ्या विद्यार्थ्यांना अकरावीच्या प्रवेशासाठी प्राधान्य दिलं जाईल. त्यानंतर उर्वरित जागांवर अंतर्गत मूल्यमापनाद्वारे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल, असंही वर्षा गायकवाड यांनी सांगितलं आहे. इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनाचा निकाल जूनच्या अखेरपर्यंत लावण्याचं लक्ष्य शिक्षण बोर्डाचं असल्याचंही वर्षा गायकवाड यांनी सांगितलं. याशिवाय जे विद्यार्थी शाळेनं केलेल्या मूल्यमापनावर खूश नसतील त्यांना पुढील काळात दोन तासांच्या परीक्षेचं आयोजन करण्याबाबतही शिक्षण विभाग विचार करत असल्याचं गायकवाड यांनी सांगितलं आहे.

## सिडको आपत्कालीन नियंत्रण कक्ष २४×७ तत्त्वावर राहणार कार्यरत

नोंदवावी. १.दूरध्वनी क्र.०२२-६७९१ ८३८३/८३८४/८३८५, २७५६२९९९, २.टोल फ्री क्र.१८००२२६७९१, ३. व्हॉटसप क्र. ८८७९४५०४५०, ४. फॅक्स क्र. ०२२-६७९१८१९९, ५. ई-मेल eoccidcoindia.com नागरिकांमार्फत फोनवरून अथवा व्हॉट्सपवरून माहिती अथवा तक्रार प्राप्त झाल्यावर नियंत्रण कक्षातील अधिकारी तातडीने निर्णय घेऊन ज्या नोडमध्ये सदर घटना घडली असेल तेथील प्रमुख अधिकाऱ्यास घटनेसंबंधी माहिती कळवतील व त्यासंबंधी योग्य ते मार्गदर्शन करतील. तसेच नियंत्रण कक्ष आवश्यक असलेल्या अग्निशमन केंद्र, हॉस्पिटल, वाहतूक पोलीस, स्थानिक पोलीस अशा संबंधित विभागाशी तातडीने संपर्क साधून घटनास्थळी आवश्यक ती मदत ताबडतोब पोहोचविण्याची दक्षता घेईल. नागरी संरक्षण दल तसेच सेवाभावी संस्थांचे स्वयंसेवक यांचेही सहकार्य याकामी घेण्यात येणार आहे.

नोडल अधिकारी, सर्व संबंधित सिडकोचे विभाग, तसेच इतर शासकीय विभाग यांच्याशी समन्वय साधण्याची महत्वाची भूमिका हा नियंत्रण कक्ष पार पाडेल. त्या घटनेसंबंधी केलेल्या कारवाईची माहिती व सद्यस्थिती नोडल अधिकारी नियंत्रण कक्षास पुरवणार आहेत. सदर माहिती नियंत्रण कक्षाकडून संपर्क साधलेल्या नागरिकांना दिली जाईल. दगडखाणी आणि मोडकळीस आलेल्या इमारतींच्या जागांवर धोक्याच्या सूचना देणारे फलक लावण्यात येणार आहेत. अपघातप्रवण जागांवर सिडकोचे सुरक्षा रक्षक तैनात ठेवले जाणार आहेत. तसेच धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात येत आहे. अतिवृष्टीच्या वेळी पाणी साठल्यास पाण्याचा उपसा करणारी यंत्रसामुग्री २४ तास उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## टास्कफोर्स व विभागाने समन्वयाने काम करावे : मुख्यमंत्री

श्रीमती इंद्रा मालो, माविमच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सध्याच्या व प्रस्तावित योजना, त्यांचा अंदाजित खर्च, अधिकच्या निधीची आवश्यकता याची एकत्रित माहिती आपल्याला देण्यात यावी जेणेकरून विभागाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी काय करता येऊ शकेल याचा धोरणात्मक निर्णय घेता येईल असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, कोरोनामुळे ज्या बालकांचे दोन्ही पालक मृत्यू पावले किंवा एक पालक मृत्यू पावला अशा बालकांबाबत विभागाने धोरण निश्चित करावे यामध्ये मुलांच्या संगोपनापासून शिक्षणापर्यंतचे लाभ त्यांना कसे देता येतील याची माहिती देण्यात यावी. माझे कुटुंब माझी जबाबदारी अभियानांतर्गत राज्यातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचून कुटुंबांचे सर्वेक्षण झालेले आहे. या सर्वेक्षणाची संपूर्ण माहिती संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे आहे. त्यात बालकांची माहिती ही समाविष्ट आहे. यामधील कमी वजनाच्या बालकांकडे अधिक लक्ष देऊन त्यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी असेही मुख्यमंत्री म्हणाले.

ग्रामीण, आदिवासी तसेच शहरी भागातील बालकांचे कुपोषण कमी करण्याच्यादृष्टीने आयसीडीएसची पुनर्रचना करण्यासंदर्भात विभागाने प्रस्ताव सादर करावा असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यातील बचतगटांनी बाजारपेठेतील मागणी आधारित वस्तुंचे उत्पादन करावे, उत्पादनात नावीन्य आणतांना कोणत्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठ आहे याचेही संशोधन केले जावे, जागतिक बाजारपेठेत निघणाऱ्या निविदांमध्ये सहभागी होऊन राज्यातील बचतगटांना काम मिळवून देण्याच्यादृष्टीने विभागाने प्रयत्न करावेत, राज्यातील बचतगट उत्पादित करत असलेल्या उत्पादनांची माहिती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहोचली पाहिजे यादृष्टीने वस्तुंच्या उत्पादनात आणि त्याच्या सादरीकरणात वेगळेपण आणावा असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. अंगणवाडी सेविका -मदतनीस, आशा वर्कर्स आणि एएनएम हा ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा आणि इतर सेवांचा पाठकणा आहे, यांना अधिक सक्षम कसे करता येईल यादृष्टीनेही विभागाने लक्ष द्यावे, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

## अनाथ बालकांच्या नावे ५ लाख रुपये ठेवण्याचा राज्य सरकारचा विचार

यशोमती ठाकूर आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची चर्चा होणार आहे. त्यानंतर हा निर्णय जाहीर होण्याची शक्यता आहे.

सद्यस्थितीत कोरोनाचा विषाणूचा वाढलेला संसर्ग आणि त्यामुळे कोवीड-१९ बाधीत व्यक्तींचे व मृत्युचे वाढलेले प्रमाण विचारात घेता, त्याचा बालकांच्या जीवनावर देखील गंभीर परिणाम होत आहे. काही प्रसंगी कोवीड-१९ या रोगामुळे दोन्ही पालकांचे निधन झाल्याने अनाथ झालेल्या मुलांची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. या बालकांची काळजी घेणारे कोणीही नसल्याने ही बालके शोषणास बळी पडण्याची तसेच बालकामगार किंवा मुलांची तस्करी सारख्या गुन्ह्यांना बळी पडण्याची शक्यता जास्त आहे.

सर्वोच्च न्यायालय येथील न्यायाधीशांच्या बाल न्याय समितीमार्फत (जे जे कमिटी) कोविड-१९ या रोगाच्या अनुषंगाने राज्यातील बालकांची काळजी व संरक्षणासंबधी कार्य करणाऱ्या संस्थांबाबत घेण्यात आलेल्या आढावा बैठकीमध्ये कोवीड मुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांच्या सुरक्षिततेबाबत उपस्थित मुद्यांच्या अनुषंगाने व इतर मुद्यांबाबत जिल्हा स्तरावर टास्क फोर्स गठित करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

## कामोठ्यात संचारबंदीदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

'तुम्ही माझ्याच पोरींना कारवाईकरीता का आणले, इतर जण फिरत असतात ते तुम्हाला दिसत नाहीत का? तुम्ही काय नोकरी करता ते आम्हाला माहीत आहे; तुम्ही पोलीस लोकांनी युनिफॉर्म घातला म्हणजे स्वतःला खूप शहाणे समजता आणि मनमानी कारभार करता' असे म्हणत सदर महिला मारहाणीच्या उद्देशाने महिला पोलिसांच्या अंगावर धाऊन आली. पोलीस ठाण्याच्या आवारात गोंधळ सुरू होताच त्याठिकाणी पोलीस हवालदार मनोज जाधव वाद मिटवण्यासाठी आले असता सदर महिलेचे पती यांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्या दोघांना कारवाईकरिता पोलीस ठाण्यात घेऊन जात असता सदर महिलेने प्रतिकार करण्यास सुरुवात केली. त्यामुळे महिलेच्या प्रतिकाराला आवर घालण्यासाठी इतर महिला कर्मचारी आल्या असता सदर महिलेने पोलिसांनाच धक्काबुक्की करण्यास सुरुवात केली.

सदर इसम व महिलेविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा तसेच धक्काबुक्की व मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकीकडे कोरोनाचे संकट; तर दुसरीकडे नियमांचे उल्लंघन करून बेशिस्तपणे वाद घालणारे नागरिक. त्यामुळे कर्तव्य निभावताना पोलीस प्रशासनाला मोठी डोकेदुखी ठरत आहे.

# कार्यतत्पर,आदर्श पोलीस अधिकारी रमेश चव्हाण

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : नवी मुंबई आयुक्तालयातील पनवेल शहर पोलीस ठाणे हे एक संवेदनशिल पोलीस ठाणे म्हणून त्या वेळी गणले जात होते. गुन्हेगारी, दरोडे, चोरी, खुन, कौटुंबिक वाद विवाद, अशा अनेक समस्यांचे निराकरण करण्याचे काम येथे येणारे वरीष्ठ पोलीस निरीक्षक आप आपल्या पध्दतीने त्याचा निपटारा करीत होते व गुन्हाचा आलेख कमी करण्याचा अटोकाट प्रयत्न करीत होते. परंतु हे काम करीत असताना प्रामुख्याने येथील गुन्हेगारी मोडीत काढण्याचे काम पनवेल शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला गुन्हे प्रकटीकरण विभाग यात काम करणारी सक्षम टीम, आणि याच टीम मध्ये त्यावेळी पो.सब.इन्सपेक्टर म्हणुन एक अत्यंत उमदे व्यक्तीमत्व असलेले व कर्तबगारी अभ्यासु अधिकारी रमेश चव्हाण दाखल झाले.

त्यांच्या सोबत शिरसाट, प्रभाकर रायते, गोडसे, इंदुरीकर ही जी धडाकेबाज टीम वरीष्ठ पोलीस निरीक्षक वसंत वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली अंत्यत जोमाने धाडसाने पनवेल हद्दीत आपले काम करू लागल्याने पनवेलची गुन्हेगारी अक्षरशा मोडीत निघाल्याचे चित्र त्या वेळी सर्व सामान्य पनवेलच्या नागरीकांना पहावयास मिळाली. वसंत वाघ यांना त्या वेळी नविमुंबई पोलीस आयुक्त रामराव घाडगे यांचे मार्गदर्शन ही अंत्यत मोलाचे ठरले होते. पनवेल पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण टीम मधील रमेश चव्हाण हे उमदे व्यक्तिमत्व असलेले अधिकारी यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगीरी बद्दल पुढे बढती मिळाल्याने ते ठाणे वाहतुक शाखा, नंतर लाचलुचपत उप अधिक्षक नविमुंबईत देखील त्यांनी आपल्या झकास कामगिरीचा ठसा उमटविला अनेक लाच मागणारे त्यांच्या कार्यकाळात धास्तावलेले होते रमेश चव्हाण पुन्हा नविमुंबई आयुक्तालय क्षेत्रात येताच ते काही काळ सिडकोच्या अतिक्रमण विभागात काम करीत होते. चांगले अधिकारी यांची दखल ही वरीष्ठांकडुन घेतली जातेच त्यामुळे नुकतीच त्यांना वाशी पोलीस ठाण्याच्या वरीष्ठ पोलीस निरीक्षक पदाची जबाबदारी कर्तव्यदक्ष दक्ष नविमुंबई पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह यांच्या कडुन सोपविण्यात आली आहे वाशी पोलीस ठाण्यात रमेश चव्हाण यांनी पदभार स्वीकारताच आपले सहकारी अधिकारी व सर्व कर्मचारी यांना आपण जनतेचे सेवक आहोत व गुन्हेगारांचे कर्दनकाळ आहोत याची जाणीव करून दिली.

तसेच कायदा व सुव्यवस्था ही चांगल्या पध्दतीने राबविली गेली पाहिजे असा संदेश देऊन निरपराध्यावर कदापी अन्याय होता कामा नये अशा सुचना देऊन कामाला सुरुवात केली. रमेश चव्हाण यांनी वाशी पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारताच विविध गुन्हयांची उकल करण्यात त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचारी यशस्वी झाले आहेत कोरोना काळात कडक पोलीस बंदोबस्त वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अगदी काटेकोरपणे पाळला जात आहे. राज्य शासनाच्या नियमावलीचे पालन वरीष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तेथे अत्यंत चांगले काम होत आहे असे नागरीकांत बोलले जात आहे.

# कोरोना काळात ग्रामीण भागातील नागरिक विविध कामात व्यस्त ; वेळेचा करीत आहेत सदुपयोग

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**



कोरोना महामारीचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता केंद्र व राज्य सरकारने लॉंकडाऊनचा कालावधी वाढविला असल्याने या फावल्या वेळेचा सदुपयोग म्हणून ग्रामीण भागातील शेतकरी व पगारदार वर्ग तसेच महिलावर्ग विविध कामात व्यस्त असल्याचे एकंदरीत परिस्थितीवरुन दिसून येत आहे.

मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात पुन्हा एकदा कोरोनाने हळूहळू डोके वर काढल्याने सर्वांच्याच चिंतेत पुन्हा ऊकदा भर पडली. तर यावर जालिम उपाय म्हणून शासनाने हळूहळू लॉंकडाऊन प्रक्रियेला सुरूवात केली. लॉंकडाऊन पुकारल्याने व अत्यावश्यक सेवा पुरविणा-यांना या कालावधीत सुट दिली असल्याने बहुतांश व्यवहार हे जवळ जवळ ठप्पच झाले आहेत. अशावेळी आपल्या फावल्या वेळेचे करायचे हा प्रश्न ग्रामीण भागातील नागरिकांना पडला असतानाच ग्रामीण भागातील शेतकरी व अन्य नागरिकांनी शेतीच्या कामाला प्रथम प्राधान्य देऊन आपल्या वेळेचा जास्तीत जास्त सदुपयोग कसा करायचा याबाबत नियोजन करुन कामाची आखणी केली आहे.

त्या अनुषंगाने कोरोनामुळे उद्भवलेली परिस्थिती लक्षात घेता अति महत्त्वाचे कामाव्यतिरिक्त सहसा कोणीही बाहेर पडताना दिसत नाही. अशावेळी ग्रामीण भागातील पुरुष व महिला आपापल्या कामात व्यस्त असल्याचे दिसून येत आहेत. महिल-ावर्ग तांदूळ, पोहे व उडदाचे पापड करणे, तांदळ व साबुदाण्याच्या फेण्या, तांदळाच्या शेवया, कडधान्ये सुकविणे आदी कामात तर शेतकरी व अन्य नोकरदारवर्ग शेतीची बांधबंदीस्ती, घरांचे बांधकाम व दुरुस्ती तसेच जंगल भागातून सरपण गोळा करणे आदी व्यस्त आहेत.ही सर्व कामे करताना सुरक्षितता म्हणुन बाहेरील माणसे मदतीला घेतली तर सोशल डिस्टन्सिंगचे पालनही करताना दिसत आहेत.तर या सर्व कामात घरातील लहान मुले मुली व वयोवृद्ध मंडळींचे सहकार्य लाभत असल्याचे पहावयास मिळत आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात असतानाच शासनाचे या आदेशांचे सर्वत्र पालन करून देशवासीय देखील कोरोनाविरूद्धच्या लढाईत आपल्या परीने शासनाला सहकार्य करीत आहेत.

# पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे-

शुक्रवार दि.२८ मे २०२१ रोजी सोईनुसार सुनिती शासकीय निवासस्थान मुंबई येथून शासकीय वाहनाने सुतारवाडी ता.रोहाकडे प्रयाण. सुतारवाडी ता.रोहा येथे आगमन व राखीव.

शनिवार, दि.२९ मे २०२१ रोजी सकाळी ०९.३० वा. सुतारवाडी ता.रोहा येथून तासगाव आदिवासीवाडी ता.माणगावकडे प्रयाण. सकाळी १०.०० वा. तासगाव आदिवासीवाडी ता.माणगाव येथे आगमन व लसीकरण व्हॅन उद्घाटन. सकाळी १०.२० वा. तासगाव आदिवासीवाडी येथून माणगावकडे प्रयाण. सकाळी १०.४५ वा. आगमन व १०२ जननी सुरक्षा अंतर्गत रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा. स्थळ : उपजिल्हा रुग्णालय, माणगाव. सकाळी ११.०० वा. मागणाव येथून वाहनाने चिखलप आदिवासीवाडी ता.म्हसळाकडे प्रयाण. सकाळी ११.४५ वा. चिखलप आदिवासीवाडी ता.म्हसळा येथे आगमन व लसीकरण व्हॅन उद्घाटन. दुपारी १२.१५ वा. चिखलप आदिवासीवाडी येथून ग्रामीण रुग्णालय, म्हसळाकडे प्रयाण. दुपारी १२.४० वा. आगमन व १०२ जननी सुरक्षा अंतर्गत रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा. स्थळ : उपजिल्हा रुग्णालय, म्हसळा. सोईनुसार सुतारवाडी ता.रोहा येथे आगमन व राखीव.

# जिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त अभिवादन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी(रोहयो) रविंद्र मठपती, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील, तहसिलदार (सर्वधारण) सतिश कदम आदी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, श्री.जनार्दन नामा भगत, वय : ६४ वर्षे, व्यवसाय : शेती, राहणार : नांदगांव, पोस्ट : पळस्पे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२२१ यांचे नावे व ताबेकब्जातील मौजे : करंजाडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील सत्यम प्रस्टीज को.ऑप.हौ.सोसायटी, सेक्टर ४, प्लॉट नं.१४, या बिल्डींग मधील त्यांचे नावे असलेले १) वाणिज्य गाळा नं.५, क्षेत्र ४२.०२३ चौ.मी. २) सदनिका नं.अे-४०४, क्षेत्र ५६.४३८ चौ.मी., ३) सदनिका नं.बी-१०५, क्षेत्र ४८.५१२ चौ.मी. ४) सदनिका नं.बी-१०१, क्षेत्र ३४.५६ चौ.मी. ५) सदनिका नं.बी-३०१, क्षेत्र ३४.५६ चौ.मी. या सदनिका / वाणिज्य गाळे त्यांनी त्यांची सख्खी मुले १) श्री.संदेश जनार्दन भगत, २) श्री.मंगेश जनार्दन भगत, दोघे सज्ञान, दोघे राहणार : नांदगांव, पोस्ट : पळस्पे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२२१ यांना खाली नमूद केल्याप्रमाणे नोंदणीकृत दस्ताने कायमस्वरुपी बक्षिसपत्राद्वारे बक्षिस दिलेले आहेत.

**बक्षिस दिलेल्या सदनिका/वाणिज्य गाळे यांचे वर्णन**

| अ. क्र. | बक्षिस दिलेल्या व्यक्तीचे नाव | सदनिका /वाणिज्य गाळे नं. | सदनिका गाळे यांचे क्षेत्र चौ.मी. | बक्षिसपत्राचा दस्त नोंदणी क्र. | बक्षिसपत्र नोंदणीकृत केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.संदेश जनार्दन भगत | अे-४०४ | ५६.४३८ | पवल-३-१८२४९-२०१९ | २९/१२/२०१९ |
| २ | श्री.मंगेश जनार्दन भगत | बी-१०५ | ४८.५१२ | पवल-२-४२०३-२०१९ | ०१/०७/२०१९ |
| ३ | श्री.मंगेश जनार्दन भगत | बी-१०१ | ३४.५६ | पवल-३-४८८९-२०२० | २४/०७/२०२० |
| ४ | श्री.संदेश जनार्दन भगत | बी-३०१ | ३४.५६ | पवल-३-४८८९-२०२० | २४/०७/२०२० |
| ५ | श्री.संदेश जनार्दन भगत श्री.मंगेश जनार्दन भगत | गाळा नं.५ | ४२.०२३ | पवल-३-४८८९-२०२० | २४/०७/२०२० |

तरी सदर वर नमूद बक्षिसपत्राद्वारे हस्तांतरीत केलेल्या सदनिका व वाणिज्य गाळ्यांवर अगर सदरहू सदनिका व वाणिज्य गाळ्यांवर अगर सदरहू सदनिका व वाणिज्य गाळ्यांच्या कोणत्याही भागावर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज, करार वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदरहू सदनिका व वाणिज्य गाळ्यांचा विनामोबदला बक्षिसपत्राद्वारे देण्याचा व्यवहार पूर्ण झाला असे समजून सिडको दप्तरी आपल्या नावे हस्तांतर करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दिनांक : २७/०५/२०२१

**सही/-**
**ॲड.वंदन धर्मा घरत**
**(बी.ए.एलएल.बी.)**
**मुणोत रेसिडेन्सी, शॉप नं.७ व ८ एच.ओ. सी.कॉलनी समोर, जुना ठाणा नाका रोड पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.८९७६६५९८३७**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## शांतिवन कुष्ठरुग्ण वॉर्डसाठी वॉशिंग मशिन भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील नेरे जवळील कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन येथील कुष्ठरुग्ण वॉर्डसाठी पनवेल मधील हर्षल रविकांत राईरकर यांनी संस्थेची गरज ओळखून वॉशिंग मशिन भेट दिली.

या मशिनचा उपयोग पुरुष व महिला निवासी वॉर्ड मधील चादरी, बेडशिट, पडदे आणि कपडे धुण्यासाठी होईल. यामुळे तेथील कार्यकर्त्यांना कपडे धुण्याचा त्रास होणार नाही तसेच वेळ व श्रमाची बचत होईल. वॉशिंग मशिन भेट देताना राजन साखरकर, गणेश दांडेकर हे उपस्थित होते. संस्थेच्या अध्यक्षा रक्षा मेहता यांच्या सु-चनेनुसार संस्थेच्या कुष्ठरुग्ण वॉर्ड व दवाखान्यासाठी आता पुन्हा संस्थेच्या कामासाठी दर बुधवारी डॉ. प्रणित गोगटे येत आहेत त्यामुळे कुष्ठरुग्णांना आता बरे वाटत आहे.



## नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, दाभोळसाठी मौजे दाभोळ येथील शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाड तालुक्यातील नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, दाभोळ (पाटीलवाडी) इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर मौजे दाभोळ ता.महाड येथील गावठाण क्षेत्र ९-९३-०० हे. आर. या मिळकती पैकी क्षेत्र ०-०४- ४१ हे.आर. ही जमीन ग्रामपंचायत दाभोळ यांच्याकडून शासनाकडे पुर्नग्रहण करुन जमीन महसूल मुक्त व सारामाफीने ही जागा नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, दाभोळ (पाटीलवाडी) करिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत. महाड तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने ही बाब महत्वाची आहे.

# कोलाड महावितरण उपभियंता यांची ग्राहकांच्या तक्रारींना केराची टोपली

## तक्रारींवर कार्यवाही नसल्याने नागरिक संतप्त

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील कोलाड विभागीय महावितरण उपभियंता यांच्या कडून ग्राहक वर्गाच्या तक्रारींना केराची टोपली कोलाड विद्युत पुरवठा कार्यालयात ग्राहक वर्गानी केलेल्या तक्रारींवर संबधित अधिकारी व सदरचे कर्मचारी कोणतीही कारवाही करत नसल्याने येथील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

या बाबत सविस्तर माहिती अशी की विद्युत वितरण पुरवठा संदर्भात कोणताही कामाचा अर्ज केला तर त्याची पोहच मिळत नाहीच तर याशिवाय अर्ज करण्यासाठी गेलेल्या ग्राहकाला या ठिकाणी दोन तीन तास कार्यालयात ताटकळत बसावे लागते तर कार्यालयात एकही कर्मचारी वेळेवर उपस्थित नसल्याने ग्राहकांची मोठी कूचंबना होत असुन या कार्यालयाचा कारभार आहे तरी कसा असा प्रश्न ग्राहक वर्गातुन व्यक्त करत संताप व्यक्त केला जात आहे.

या बाबत तुकाराम नामदेव महाडिक यांनी थ्री फेज वायर सुरु करण्यासाठी अर्ज केला होता वारंवार तोंडी सांगून कोणताही परिणाम



झाला नसल्यामुळे त्यांनी दिनांक ८ मे २०२१ रोजी लेखी अर्ज केला होता.त्याचा कोणताही जबाब त्यांना मिळाला नाही त्यानंतर त्यांनी २४ मे २०२१ रोजी पुन्हा अर्ज केला व त्याची पोच मागण्यासाठी ते कोलाड येथील कार्यालयात गुरुवार दि.२७ मे रोजी दुपारी १.३० वा गेले असता त्यांना सदरील या अर्जाची झेरॉक्स आणा मग तुम्हांला पोच देतो नंतर ग्राहक महाडिक यांनी ताबडतोब त्याची झेरॉक्स प्रत घेऊन आल्यानंतर या कार्यालयात कोणीच कर्मचारी नाही ते तब्बल तीन तासाहून अधिक काळ या ठिकाणी थांबले मात्र कोणीही आले नसल्याने ते रिकाम्या हाती परतले.

महाडिक यांच्या घरा शेजारून जाणारी विद्युत वाहिनी २०११ पासून थ्री फेज असणारी लाईन ही एक फेज केल्यामुळे त्यांच्या घरातील विद्युत पुरवठा कमी होत असल्याने कुलर, मिक्सर, फ्रिज, फॅन, व पाण्याचा पंप चालत नाही त्यामुळे तुकाराम महाडिक यांनी दोन वेळा ही लाईन थ्री फेज करण्यासाठी अर्ज केला होता त्या अर्जाची पूर्तता सोडाच त्याची पोच पावती देखील नाही थेट केराची टोपली परंतु या संदर्भात पुन्हा या तक्रारी बाबत विचारणा करण्यासाठी व पोच घेण्यासाठी या कार्यालयात २७ मे रोजी तुकाराम महाडिक यांचा मुलगा निलेश महाडिक हे गेले असता ते देखील तीन तासांहून अधिक वेळ बसले तरी सदरील अधिकारी अथवा कर्मचारी कोणी फिरकले नाही. असा सदररील कार्यालयाचा भोंगळ कारभार पाहताच कोलाड विभागीय शिवसैनिक निलेश महाडिक यांनी थेट यांची चौकशी व्हावी यासाठी आमदार महेंद्र दळवी यांच्याशी मोबाईलवरून संपर्क साधत आशा या भोंगळ कारभार या विषयी तक्रार केली असल्याचे निलेश यांनी माहिती दिली. कोलाड विभागात एका वर्षा पासुन अनेक विविध कामे बाकी आहेत या विषयी वर्तमान पत्रातून बातम्या आल्या कि त्याची पाहणी केली जाते परंतु काम मात्र पुर्ण केले जात नसल्याचे सर्वत्र बोलले जात आहे.

## सामाजिक कर्तव्य भावनेने हिंदाल्को कंपनीने जिल्हा प्रशासनास दिले २० जम्बो ऑक्सिजन सिलेंडर्स

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोविड-१९ या आपत्कालीन काळात कोविड रुग्णांसाठी उपयोगी पडावेत यासाठी आदित्य बिर्ला ग्रुपच्या तळोजा येथील हिंदाल्को कंपनीने जिल्हा प्रशासनाला २० माक सीजन सिलेंडर्स देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार त्यांनी आज (दि.२८ मे) रोजी २० जम्बो ऑक्सिजन सिलेंडर्स जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्याकडे जिल्हाधिकारी कार्यालयात सुपूर्द केले.

यावेळी तहसिलदार सचिन शेजाळ, हिंदाल्को इंडस्ट्रीजचे सीएसआर चे लहू रौधल उपस्थित होते. हिंदाल्को इंडस्ट्रीजचे युनिट सीएसआर चे लहू रौधल यांनी यावेळी सांगितले की, आमचे युनिट हेड सोमोजीत डॉन, युनिटचे एच. आर. हेड सुधीर मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली काही दिवसांपूर्वी आरसीएफ येथील कोविड केअर सेंटरला २० ऑक्सिजन कॉन्स्ट्रेटर देण्यात आले होते. त्यावेळी सांगितल्याप्रमाणे २० जम्बो ऑक्सिजन सिलेंडर्स आज जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत. गेल्या काही दिवसांपासून अलिबाग तालुक्यात करोना रूग्णांच्या संख्येत पुन्हा वाढ झाल्याने आरोग्य यंत्रणांवरील ताण पुन्हा वाढला. तो ताण कमी व्हावा व रुग्णांना ऑक्सिजनची कमतरता भासू नये, या हेतूने हे ऑक्सिजन सिलेंडर्स



देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या सूचनेनुसार हे ऑक्सिजन सिलेंडर्स जिल्हा सामान्य रुग्णालयास देण्यात आले आहेत.

## थ्री स्टार हॉटेलमध्ये पोलिसांनी केले मॉक ड्रील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर मधील थ्री स्टार हॉटेल मध्ये अतिरेकी घुसल्याचा संदेश खारघर परिसरात पसरल्याने एकच गोंधळ आणि घबराट निर्माण झाली. पोलीस यंत्रणा सतर्क झाली. तत्काळ बॉम्ब शोध पथकासह मोठा पोलीस फौजफाटा गोळा झाला. लपलेल्या अतिरेक्यांना शोधण्यासाठी सुरु असलेल्या या कोंबिंग ऑपरेशन द्वारे लपलेल्या दोन अतिरेक्यांच्या मुसक्या आवळण्यात आल्याचे चित्र हॉटेलमध्ये काम करणारे कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांचे झोप उडविणारे होते. मात्र, सदर दृश्य म्हणजे पोलिसांनी केलेले 'मॉक ड्रील' होते, असे समजल्यावर सर्वांचाच जीव भांड्यात पडला.

सायन-पनवेल महामार्ग लगत नेहमी गर्दीने गजबजलेल्या खारघर हिरानंदानी पुलजवळील थ्री स्टार हॉटेल मध्ये पोलिसांचे मॉक ड्रील झाले. हॉटेल मध्ये दोन अतिरेकी लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर संपूर्ण पोलीस यंत्रणा सतर्क होऊन कामाला लागली. तत्काळ घटनास्थळी बॉम्ब शोध पथक, श्वान पथक, अग्निशमन दल, रुग्णवाहिका, वाहतुक आणि स्थानिक पोलीस या रंगीत तालीममध्ये सहभागी झाले. हॉटेलमध्ये लपून बसलेल्या अतिरेक्यांचा माग काढण्यासाठी पोलीस यंत्रणेने या परिसराची रेकी करुन कारवाई करण्यासाठी ठिकाणे निश्चित केली. त्यानंतर तुकड्यांमध्ये विभागून पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन केले. या कोंबिंग ऑपरेशमध्ये दोन अतिरेक्यांच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले. खारघर सेक्टर-७ मधील क्रिस्टल प्लाझा इमारतीत थ्री स्टार हॉटेलसह इतर छोटी हॉटेल, चायनीज शॉप, बँक एटीएम, खानावळ, टुरिस्ट बुकिंग दुकाने मिळून जवळपास २०० दुकाने आणि रहिवासी संकुल आहे. क्रिस्टल प्लाझा इमारती शेजारी रॉयप ट्युलिप हॉटेल, विविध शोरुम असल्याने आणि लागूनच सायन-पनवेल महामार्गावर बस थांबा असल्याने या भागात नागरिकांची गर्दी असते. 'कोरोना'च्या परिस्थितीत अचानक अतिरेक्यांनी हल्ला केल्यास त्यांचा बिमोड



करण्यासाठी सदर रंगीत तालीम घेण्यात आले. यावेळी 'खारघर पोलीस स्टेशन'चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी, जलद प्रतिसाद पथक प्रमुख मानसिंग दुबल यांच्यासह आग्नशमन आणि वाहतुक पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## श्रीवर्धन,अलिबाग, महाड या बस सेवा सुरू करण्याची प्रवाशांची मागणी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

संपूर्ण राज्यामध्ये व जिल्ह्यामध्ये कोरोना रुग्ण संख्या कमी होऊ लागल्यानंतर आता एसटी महामंडळाने देखील आपली एसटी बस सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार श्रीवर्धन आगारातून श्रीवर्धन बोरवली, श्रीवर्धन नालासोपारा, श्रीवर्धन कल्याण, श्रीवर्धन पनवेल, श्रीवर्धन मुंबई इत्यादी बस सुरू करण्यात आल्या आहेत. श्रीवर्धन परिवहन आगारातून बस सेवा सुरू झाली असली तरी अद्याप खाजगी बस चालक देखिल श्रीवर्धन आगाराच्या गेट वरती उभे राहून प्रवास घेत असतात.

सकाळच्या वेळेस व दुपारी नालासोपारा येथे जाण्यासाठी अनेक खाजगी बस श्रीवर्धन आगाराच्या जवळपास उभ्या असलेल्या पाहायला मिळतात. आता एसटी बस सेवा सुरू झाल्यामुळे खासगी बस बंद करण्याची मागणी प्रवाशांमधून होत आहे. कारण कोरोना काळा मध्ये या खाजगी बस वाल्यांनी प्रवाशांना अक्षरशः लुटले होते. रायगड जिल्ह्याचे मुख्य ठिकाण अलिबाग या ठिकाणी असल्यामुळे अनेक नागरिकांची कामे अलिबाग येथे नियमित सुरू असतात. मात्र श्रीवर्धन अलिबाग ही थेट बस सेवा सध्या सुरू नसल्याने प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत. सकाळी साडेपाच वाजता श्रीवर्धन आगारातून सुटणारी श्रीवर्धन अलिबाग ही बस फेरी सुरू करण्यात यावी. तसेच अलिबाग येथून संध्याकाळी पाच पंचेचाळीस वाजता अलिबाग श्रीवर्धन ही बस फेरी पुन्हा सुरू करण्यात यावी, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे. तसेच सायंकाळी सहा वाजून पंधरा मिनिटांनी सुटणारी श्रीवर्धन महाड ही बस सेवा देखील आगाराने सुरू करावी. कारण महाड, गोरेगाव परिसरातून श्रीवर्धन येथे अनेक जण शासकीय कार्यालयांमध्ये किंवा खाजगी कामासाठी नियमितपणे येत असतात. हीच बस सकाळी महाड येथून सुटून श्रीवर्धन येथे येत असल्यामुळे नागरिकांना कामावर येणे देखील सोपे जाते. तरी श्रीवर्धन अलिबाग आणि श्रीवर्धन महाड ही बस सेवा देखील सुरू करण्याची मागणी प्रवाशांमधून होत आहे.

## नवघर ग्रामपंचायतमधील भाजप सदस्यांचा शिवसेनेत प्रवेश

**दै.रायगड नगरी । उरण**

माजी आमदार तथा शिवसेना जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर यांच्या कोव्हीड काळातील उल्लेखनीय कार्यावर प्रेरीत होवून भाजपचे माजी तालुका वाहतूक सेना अध्यक्ष तथा नवघर ग्रा. पं. चे विद्यमान सदस्य रवि(गणेश) वाजेकर व सदस्या सौ. लिना रतन चोगले तसेच रतन चोगले यांनी आपल्या कार्यकर्त्यांचा समवेत माजी आमदार मनोहर भोईर यांच्या जनसंपर्क कार्यालयात शिवसेनेत जाहीर प्रवेश



केला. यावेळी माजी आमदार मनो-हरशेठ भोईर यांनी प्रवेशकर्त्यांचे शिवबंधन बांधून पक्षात स्वागत केले.

माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी १९० उरण विधानसभा हद्दीतील केलेली विकासकामे तसेच जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचा ध्यास, बघता इतर पक्षांतील कार्यकर्त्यांचा ओघ शिवसेनेकडे वाढत चालला आहे.

याप्रसंगी कार्यकर्त्यांचे माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी पक्षात स्वागत करुन शिवसेना आपल्या पाठीशी ठामपणे उभी राहील. तसेच आपल्या विश्वासाला कधीही तडा जा-वून देणार नसल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जि.प.सदस्य विजय भोईर, पं.स. सदस्य दिपक ठाकूर, सरपंच आरती चोगले, उपसरपंच हितेश भोईर, मंगेश चोगले उपस्थित होते.

## जांभुळपाडा गावावरील पाणी संकट संपले; नवीन मोटार पंप बसविला

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा गावात पाच दिवसांपासून पाणी आले नव्हते. पाणी खेचणारे पंप नादुरस्त झाल्याने ग्रामस्थांवर ऐन उन्हाळ्यात पाणी संकट ओढवले होते. गुरुवारी (ता.२७) सायंकाळी येथे नवीन मोटार बसविण्यात आली आहे. अशी माहिती सरपंच श्रद्धा कानडे यांनी दिली. त्यामुळे शुक्रवारी (ता.२८) येथील पाणी पुरवठा सुरळीत झाला आहे.



जांभूळपाडा गावाला येथील अंबा नदीतून पाणीपुरवठा केला जातो. नदीचे पाणी एका मोटार पंपाने ओढून जॅकवेल मध्ये आणले जाते. आणि तेथून जलकुंभ मध्ये साठवून पाणीपुरवठा केला जातो. त्योक्ते वादळात येथील मोटर पंप जळाला होता. त्यानंतर तिथे दुसरा मोटार पंप बसविण्यात आला. मात्र तोही बिघडला आहे. परिणामी दोन्ही पंप दुरुस्तीसाठी दिले असल्याने मागील ५ दिवसांपासून जांभूळपाडा ग्रामस्थांवर पाणी संकट ओढवले होते. मात्र आता नवीन मोटार पंप बसविल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

## जागृती पुर्नवसन केंद्रासाठी खास लसीकरण सत्राचे आयोजन ; ७७ रुग्णांचे कोविड लसीकरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेच्या वतीने जागृती पुर्नवसन केंद्र येथे खास कोविड लसीकरणाचे सत्र आयोजित करण्यात आले.

या पुर्नवसन केंद्रामधे मनोरुग्ण, अर्धांग वायूचे रुग्ण, स्मृतीभ्रंश, व्यसनमुक्तीसाठी आलेले रुग्ण, रुग्णशय्येवर असलेले रुग्ण आहेत. ४५ वर्षापासून ते ९० वर्षापर्यंतचे रुग्ण याठिकाणी आहेत. यामध्ये ८० वर्षापेक्षा जास्त वयाचे ५१ रुग्ण आहेत आणि २६ मनोरुग्ण आहेत. शासकीय लसीकरण केंद्रावरती जाऊन हे रुग्ण लस घेऊ शकत नसल्याने जागृती पुर्नवसनकेंद्राने महापालिकेला या ठिकाणी वैद्यकीय विभागाच्या कर्मचाऱ्यांनी येऊन लसीकरण करावे अशी विनंती केली होती. रुग्णांची अवस्था लक्षात घेऊन महापालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाने तातडीने या पुर्नवसन केंद्रावरती खास लसीकरण सत्राचे आयोजन केले. यावेळी ७७ रुग्णांचे कोविड लसीकरण करण्यात आले.


## पनवेल महानगरपालिका
### मालमत्ता कर विभाग

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ११ व कराधान नियम ८, अन्वये ५ दि.०१ ऑक्टोबर २०१६ पासून ते सन २०२१-२२ या वर्षाकरिता सुधारित कर आकारणीची अंतिम यादी जाहीर प्रसिद्धी बाबतची सूचना नोटीस

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय 'अ','ब','क','ड' अंतर्गत सिडको नोड-कामोठे, कळंबोली, तळोजा पा., खारघर, नवीन पनवेल पूर्व आणि पश्चिम या क्षेत्रातील सर्व मालमत्ता धारकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आपल्या भोगवट्यातील इमारतीची व भूखंडाचे तपासणी व कर मुल्यांकन करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ११ नगरपालिका कराधान नियम क्र.१२७, १२८ अ, १२९, १२९ अ, १३१, १३२ व प्रकरण ८ कराधान नियम कलम ८ ते १९ अन्वये पुर्वलक्षी प्रभावाने लागू असून दि.०१ ऑक्टोबर २०१६ पासून ते सन २०२१-२२ या वर्षाकरिता इमारतीचे व भूखंडाचे कर निर्धारणाककरिता लागू करण्यात आलेल्या अंतिम करमुल्यांकन याद्यांची प्रसिद्धी दि.२९/०५/२०२१ रोजी करण्यात येत आहे.

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय 'अ','ब','क','ड' अंतर्गत सिडको नोड-कामोठे, कळंबोली, तळोजा पा., खारघर, नवीन पनवेल पूर्व आणि पश्चिम या क्षेत्रातील सर्व मालमत्ता (इमारती व खुले भूखंड) यांची मालकी असलेल्या मालमत्ता धारकांना / भोगवटा धारकांना अंतिम करमुल्यांकन यादी जाहीर प्रसिद्ध केली आहे. जाहीर प्रसिद्ध केलेली अंतिम करमुल्यांकन यादी संबंधित प्रभाग समिती कार्यालयात पाहणीकरिता कार्यालयीन वेळेस उपलब्ध आहेत.

तसेच सुधारित चालू मागणी व सर्व मालमत्तांची सन २०२०-२१ पर्यंत वसुली व थकबाकी यांचे समायोजन करून सर्व मालमत्ता धारकांना सन २०२१-२२ करिता सुधारीत देयक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ८ नियम ३०, ३९ व ४० या अन्वये बजाविण्यात येईल.

(टिप :- ज्या मालमत्ता धारकांनी संबंधित मालमत्तेच्या करमुल्यांकन/नावातील बदला बाबत आक्षेप अर्ज दाखल केला असेल, व सुनावणीची प्रक्रिया प्रलंबित असेल अशा मालमत्तांच्या सुनावणी/पुनःस्थळ तपासणी बाबत फेरबदल व समायोजनास अधिन राहून अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे.)

संपर्क अधिकारी
१) वंदना गुळवे (सहा-आयुक्त)
२) सुनील मानकामे (विभागप्रमुख-मालमत्ता कर विभाग)
भ्रमणध्वनी क्र. : १८००-५३२०-३४०
फोन नं.०२२-२७४५८०४०/४१/४२
ईमेल-pmc.tax2016@gmail.com

**सही/-**
**(सुधाकर देशमुख)**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

प्रभाग समिती (अ)-प्रभाग समिती 'अ' सेक्टर-१३, प्राथमिक शाळेजवळ, पुर्वाश्रमीचे ग्रामपंचायत कार्यालय खारघर, पनवेल महानगरपालिका
प्रभाग समिती (अ)-उपविभाग कार्यालय नावडे, नावडे गाव कमानी जवळ, जुने नावडे ग्रामपंचायत कार्यालय, पनवेल महानगरपालिका
प्रभाग समिती (ब)-काळभैरव मंगल कार्यालय सेक्टर क्र.१ ई, कळंबोली गाव, कळंबोली पनवेल महानगरपालिका
प्रभाग समिती (क)-कार्यालय, कराडी समाज हॉलजवळ, सेक्टर क्रं.१४, कामोठे, पनवेल महानगरपालिका
प्रभाग समिती (ड)- विलासराव देशमुख कॉम्प्लेक्स श्री.शिवाजी महाराज चौक, पनवेल महानगरपालिका

